**कुवेतमधील ‘हला मोदी’ कार्यक्रमात पंतप्रधानांचे भारतीय समुदायाला संबोधन**

21 डिसेंबर 2024

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज कुवेतमधील शेख साद अल-अब्दुल्ला इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे ‘हला मोदी’ या विशेष कार्यक्रमात कुवेतमधील भारतीय समुदायाच्या भव्य मेळाव्याला संबोधित केले. कुवेतमधील समुदायाच्या विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे भारतीय नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

2.समुदायाने पंतप्रधानांचे विलक्षण आपुलकीने आणि उत्साहाने स्वागत केले. मेळाव्याला संबोधित करताना पंतप्रधानांनी नमूद केले की, भारत-कुवेत संबंध भारतीय समुदायाने सखोलपणे समृद्ध केले आहेत, जे दोन्ही राष्ट्रांमधील संबंध जोपासण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. कुवेतचे अमीर यांचे त्यांच्या विनम्र निमंत्रणाबद्दल आभार मानून पंतप्रधान म्हणाले की, दीर्घकालीन मैत्री बळकट आणि दृढ करण्यासाठी 43 वर्षांनंतर एक भारतीय पंतप्रधान कुवेतला भेट देत आहे.

3. पंतप्रधानांनी कुवेतच्या विकासासाठी समुदायाच्या कठोर परिश्रम, कामगिरी आणि योगदानाचे कौतुक केले, ज्याची स्थानिक सरकार आणि समाजाने मोठ्या प्रमाणावर दखल घेतली असल्याचे ते म्हणाले. भारतीय समुदायाच्या कल्याणासाठी त्यांनी कुवेतच्या नेत्यांचे आभार मानले. कुवेत आणि आखाती देशांतील इतरत्र भारतीय कामगारांना पाठिंबा देण्याची भारताची दृढ वचनबद्धता व्यक्त करून, त्यांनी ई-मायग्रेट पोर्टल सारख्या सरकारने हाती घेतलेल्या तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांबद्दल सांगितले.

4. पंतप्रधानांनी "विश्वबंधू", जगाचा मित्र म्हणून भारताचा दृष्टिकोन मांडला. त्यांनी भारताची वेगवान प्रगती आणि परिवर्तन, विशेषत: तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि शाश्वतता या क्षेत्रांतील, विशद केली. त्यांनी नमूद केले की, जगातील 5वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असण्यासोबतच, भारत फिनटेकमध्ये जागतिक आघाडीवर आहे, स्टार्ट-अप स्पेसमधील तिसरा सर्वात मोठा जागतिक खेळाडू आहे आणि जगभरातील सर्वाधिक डिजिटली कनेक्टेड असलेल्या समाजांपैकी एक आहे. त्यांनी आर्थिक समावेशन, महिला-संचालित विकास आणि सर्वसमावेशक वाढ यासारख्या उपलब्धींवर प्रकाश टाकला. विकसित भारत आणि नवा कुवेत या दोन्ही देशांच्या सामायिक आकांक्षा व्यक्त करून त्यांनी भारत आणि कुवेत यांना एकत्र काम करण्याच्या मोठ्या संधी असल्याचे अधोरेखित केले. भारताची कौशल्य क्षमता आणि नवोपक्रम दोन्ही देशांमधील नवीन भागीदारीला जोपासू शकतात.

5. जानेवारी 2025 मध्ये भारतात होणाऱ्या प्रवासी भारतीय दिवस आणि महाकुंभमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधानांनी कुवेतस्थित भारतीय सदस्यांना आमंत्रण दिले.

कुवेत सिटी

21 डिसेंबर 2024